मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 20 ऑक्टोबर 2024 | पान- 1

# भोंडवेंच्या शिवबंधनामुळे शहर शिवसैनिकात नाराजी

## निवडणुका डोळ्यासमोर ठेवून झालेल्या पक्षप्रवेशाला शिवसैनिकांचा विरोध : पक्षश्रेष्ठींकडे शिवसैनिकांची मुंबईत बैठक- शहराध्यक्ष ॲड. भोसले यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकांचे पडघम सुरु झाले आहेत. त्यामुळे कोणी तुतारी तर कोणी शिवबंधन तर कोणी कमळ हातात घेऊन उमेदवारी मिळवू पाहत आहे. त्यामध्ये निष्ठावंत दुखावले जात असल्याचे चित्र शहरातील राजकारणात पहायला मिळत आहे. शुक्रवारी (दि.१८) रोजी राष्ट्रवादीचे अजित पवार गटाचे माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांनी शिवसेनेत प्रवेश केला. याबाबत शहर शिवसैनिकाला कुठलीही कल्पना नसल्याने नाराजी निर्माण झाली आहे. पक्षात फूट पाडण्याचा किंवा गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याने रविवारी (दि. २०) रोजी मुंबईत पक्षश्रेष्ठींसोबत बैठक आयोजित केली असल्याची माहिती शिवसैनिकांनी दिली.

राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांचा शिवसेना प्रवेश शहर शिवसेनेला रुचल्याचे दिसत नाही. 'आम्हाला विचारात न घेता कुणाचा शिवसेना ठाकरे गटात पक्षप्रवेश झाल्यास त्या आयात उमेदवाराचे आम्ही काम करणार नाही', असा ठराव उद्धव सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. पक्षविस्तारासाठी झालेल्या पक्षप्रवेशाला आमचे स्वागत आहे. मात्र निवडणुका आणि उमेदवारी डोळ्यासमोर ठेवून कोणी पक्षप्रवेश करत असेल तर त्याला शहर शिवसैनिकांचा विरोध आहे. पक्षश्रेष्ठींसोबत याबाबत चर्चा करणार आहोत. पक्षश्रेष्ठी नक्कीच आमचे म्हणणे ऐकून घेतील. निवडणुकीत कुठलाही चुकीचा किंवा शिवसैनिकांना डावलून निर्णय घेणार नाहीत असा विश्वास शहराध्यक्ष भोसले यांच्यासह शिवसैनिकांनी व्यक्त केला. यावेळी शिवसेनेचे संजोग वाघेरे, सुलभा उबाळे यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.



### मोरेश्वर भोंडवे यांच्या प्रवेशाबद्दल शिवसैनिक अवाक

» भोंडवे यांचा शिवसेनेत प्रवेश झाला. त्याबद्दल पक्षातील कुठल्याही पदाधिकाऱ्याला कल्पना नव्हती. प्रवेश झाला त्याबद्दल आक्षेप नाही. मात्र निवडणुका डोळ्यासमोर ठेवून झालेल्या प्रवेशाबद्दल आक्षेप आहे. कुठली जागा कोण लढवणार हे अद्याप जाहीर नाही. मात्र अशा प्रवेशामुळे पक्षांत वातावरण दुषित होते आहे. संघटनेत फूट पाडण्याचा प्रयत्न केला जात असल्याची नाराजी शिवसैनिकांनी व्यक्त केली आहे.

### उद्धव साहेब चुकीचा निर्णय घेणार नाहीत...

» विधानसभेची उमेदवारी देताना उद्धव साहेब निष्ठावंत शिवसैनिकांचे मत विचारात घेऊनच उमेदवारी देणार, हा आमचा विश्वास आहे. त्यासाठीच रविवारी (दि.२०) रोजी पक्षश्रेष्ठी उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्यासोबत शहर शिवसैनिकांची बैठक आयोजित केली आहे. उद्धव साहेब उमेदवारी देताना चुकीचा निर्णय घेणार नाहीत. त्यांचा आदेश शिवसैनिक डावलणार नसल्याचे शहराध्यक्ष ॲड. सचिन भोसले यांनी सांगितले.

---

# नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी वाहनांचा ताफा, दालनातील उपस्थितांची संख्या नियंत्रित करण्याचे आदेश

## जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी जारी केले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेदरम्यान नामनिर्देशनासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात येताना आणावयाची वाहने, दालनात उपस्थित राहणाऱ्या व्यक्तींची संख्या नियंत्रित करण्याबरोबरच मिरवणूक, सभा घेणे, घोषणा देण्यास प्रतिबंध करण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी जारी केले आहेत.



या आदेशानुसार उमेदवारांना जिल्ह्यातील निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात येताना वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटारगाड्या, वाहने यांचा समावेश करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात पाच व्यक्ती उपस्थित राहतील, या व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाच्या परिसरात नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस मिरवणूक, सभा घेणे, घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत.

सदरचा आदेश दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत अंमलात राहील. आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ मधील तरतुदीनुसार व भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२३ प्रमाणे दंडनीय कार्यवाहीस पात्र राहतील, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# ...त्या स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसांचे वाटप

## महानगरपालिकेच्या 42 व्या वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन...

**पिंपरी | प्रतिनिधी**

महिला अधिकारी आणि कर्मचा-यांच्या आकर्षक रांगोळीची स्पर्धा, फॅन्सी ड्रेस स्पर्धेत विविध वेषभूषेतील महिलांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा आणि कडधान्य व भाज्यांच्या नैसर्गिक रंगानी युक्त चौरंगी हलवा तसेच पराठा, थालपीठासह झणकेबाज तिखट पदार्थ यांनी सजलेल्या पाककला विविध स्पर्धा नुकत्याच पार पडल्या.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ४२ व्या वर्धापनदिनानिमित्त १० ऑक्टोबर रोजी पाककला, फॅन्सी ड्रेस आणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते. तथापि त्या दिवशी थोर उद्योगपती पद्मविभूषण दिवंगत रतन टाटा यांचे निधनामुळे सदर स्पर्धांचे नियोजन १६ ऑक्टोबर रोजी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये करण्यात आले होते. त्यानुसार माध्यमिक शिक्षण विभागाकडून घेण्यात आलेल्या पाककला, फॅन्सी ड्रेस आणि रांगोळी स्पर्धेतील विजेत्या कर्मचा-यांची नावे पुढीलप्रमाणे..

नाष्ट्याचा गोड पदार्थ विथ स्मुदी - या पदार्थात कॉम्प्यूटर ऑपरेटर स्मिता जोशी यांनी प्रथम, लघुलेखक शिल्पा निफाडकर यांनी द्वितीय तर प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षिका जयश्री सालोटगी यांनी तृतीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेत उपलेखापाल गीता धंगेकर आणि पूजा भोसले यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. नाष्ट्याचा तिखट पदार्थ विथ सॅलड - या पदार्थात उपलेखापाल दिपाली कर्णे यांनी प्रथम, प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षिका सारिका सूर्यवंशी यांनी द्वितीय तर गुणवत्ता आश्वासक सहाय्यक सरिता गायकवाड यांनी तृतीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेत लिपिक रेश्मा जगताप आणि शिक्षिका सीमा बुरांडे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. फॅन्सी ड्रेस स्पर्धेत कॉम्प्यूटर ऑपरेटर माधुरी चव्हाण यांनी प्रथम, लिपीक मनिषा खेडकर यांनी द्वितीय तर क्रिडा पर्यवेक्षक जयश्री साळवे यांनी तृतीय पारितोषिक मिळाले. या स्पर्धेत शिक्षिका जयश्री सालोटगी आणि सरिता गायकवाड यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. तर रांगोळी स्पर्धेत वर्षा शेलार यांनी प्रथम, सिमा बुरांडे यांनी द्वितीय आणि शितल फुले यांनी तृतीय क्रमांक मिळविला. तर, कुमार कटके आणि समीर पटेल यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

स्पर्धेतील विजेत्यांना महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. वर्षा डांगे, डॉ. अंजली ढोणे, प्रशासन अधिकारी राजीव घुले, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध विभागातील महिला कर्मचारी उपस्थित होत्या. स्पर्धेच्या प रिक्षणाचे कामकाज माध्यमिक शिक्षिका शुभदा ताठे, चारूशीला फुले, कलाशिक्षक सागर बंडलकर यांनी पाहिले. स्पर्धेचे व बक्षिस वितरणाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले उपस्थितीतांचे आभार राजीव घुले यांनी मानले.

# पुण्यात होणार 'हेल्मेट सक्ती'

## सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष सेवानिवृत्त न्यायमूर्ती अभय सप्रे यांचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

रस्ता अपघातात दुचाकी वाहनचालकांची बळींची संख्या दिवसेंदिवस वाढत त्यामुळे वाहनचालकाने स्वत: आणि सोबत बसलेल्या व्यक्तीने रस्ता सुरक्षा मानकांची पूर्तता करणाऱ्या हेल्मेटचा वापर करावा. त्यासाठी प्रशासनाने दुचाकी वाहनचालकांसाठी हेल्मेट सक्ती करावी. वाहतूक नियमांची जनजागृती करण्यासाठी रस्ता सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करावे, अशा सूचना न्यायमूर्ती अभय सप्रे यांनी केल्या. वाहन अपघातात निष्पाप नागरिकांचे बळी जाऊ नयेत यासाठी सर्व संबधित यंत्रणांनी रस्ते सुरक्षा नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी, त्यासाठी सर्वंकष धोरण तयार करावे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष सेवानिवृत्त न्यायमूर्ती अभय सप्रे यांनी दिले.

विधान भवन येथे आयोजित रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी परिवहन आयुक्त विवेक भिमनवार, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले,



### वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे

» वाहनांच्या संख्येत वाढ होत असल्याने रस्ता सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांनीही वाहतूकीचे नियम स्वयंस्फूर्तीने पाळणे आवश्यक आहे. रस्यावर चालविण्यात येणारे वाहन सुस्थितीत असावे, वाहनचालकांनी सीट बेल्ट लावावे, वाहन चालवितांना मोबाईलवर बोलू नये, अतिवेगाने वाहन चालवू नये, मद्यप्रशान करुन वाहन चालवू नये, वाहन परवाना तसेच वाहन व वाहनचालकांनी सुरक्षा विमा वेळोवेळी नुतनीकरण करावे, रस्ता सुरक्षा उपाययोजनांची माहिती करुन घ्यावी, त्यासाठी स्वत:हून पुढाकार घ्यावा, वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, अशा सूचना न्यायमूर्ती सप्रे यांनी केल्या.

जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, विभागीय आयुक्तालयाच्या उपायुक्त वर्षा लड्डा-ऊंटवाल, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर, पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, पिंपरी चिंचवडचे प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण आदी उपस्थित होते.

बेदरकारपणे आणि बेजबाबदारपणे वाहने चालवून निष्पाप नागरिकांच्या बळींच्या संख्येत वाढ होत आहे ही गंभीर बाब आहे, असे सांगून न्यायमूर्ती श्री.सप्रे म्हणाले, रस्ता अपघात कमी व्हावे, अपघातातील जखमींना तातडीने वैद्यकीय उपचार मिळावे, बळींची संख्या कमी व्हावी याची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्यासाठी वेळोवेळी मार्गदशक तत्वे निश्चित केली केली असून सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली रस्ता सुरक्षा समिती स्थापन केली आहे. ही समिती कायमस्वरुपी कार्यरत असून रस्ता सुरक्षेसंदर्भात उपाययोजना आणि त्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती थेट सर्वोच्च न्यायालयास सादर करते असे त्यांनी सांगितले.

निष्पाप नागरिकांच्या रस्ते अपघातात बळींची संख्या लक्षात घेता परिवहन विभाग, पोलीस विभाग तसेच सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी सकारात्मकतेने काम करावे. अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक बजावण्याबरोबरच निस्वार्थ भावनेने काम करावे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन रस्ता सुरक्षेसंबधी नियमांची कठोरपणे अंमलबजावणी करावी. अपघातातील बळींची संख्या कमी होण्यासाठी प्रयत्न करावे. या बैठकीत दिलेल्या निर्देशांचे सर्व संबधित यंत्रणांनी गांभीर्यपूर्वक पालन करावे. अशा सूचना न्यायमूर्ती सप्रे यांनी केल्या.

### जिल्हा तसेच शहरांतर्गत तपासणी करण्याची सूचना

» विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले, सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, जिल्हा परिषद, महामंडळ, शाळा, महाविद्यालयात कार्यरत असणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी हेल्मेट सक्ती करण्यात येईल. हेल्मेट न वापरणाऱ्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल, त्यासाठी आवश्यक त्या सूचना संबधित विभागप्रमुखांना जारी करण्यात येतील अशी सांगून ते पुढे म्हणाले, राज्य तसेच राष्ट्रीय महामार्गांवर करण्यात येणाऱ्या वाहनांच्या तपासणीप्रमाणे जिल्हा तसेच शहरांतर्गत तपासणी करण्याची सूचना डॉ.पुलकुंडवार यांनी केली.

# सीईटी सेलकडून संकेतस्थळावर डॅशबोर्ड लावण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

## नेमके किती प्रवेश झाले, किती जागा शिल्लक ही माहिती संशयास्पद; माहितीपासून विद्यार्थी, पालक राहतात अनभिज्ञ

**पुणे | प्रतिनिधी**

अकरावी प्रवेशासारखी माहिती देणारा डॅशबोर्ड जाणीवपूर्वक उच्च आणि तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांचा सीईटीसेलच्या संकेतस्थळावर दिला जात नाही. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांचे प्रचंड नुकसान होत आहे. त्यामुळे नेमके कशामुळे सीईटी सेलला डॅशबोर्डचे वावडे आहे, असा प्रश्न आता विद्यार्थी आणि पालकांनी उपस्थित केला आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेलमार्फत दरवर्षी उच्च आणि तंत्रशिक्षणच्या व्यवसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. परंतु या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासंदर्भातील पूर्ण माहिती विद्यार्थी आणि पालकांना दिली जात नाही.

सीईटी सेलमार्फत वेगवेगळ्या १९ व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येत असलेल्या सीईटी परीक्षांना दरवर्षी तब्बल ११ लाखांवर विद्यार्थी बसतात. संबंधित विद्यार्थी अभियांत्रिकी, एमबीए, एमसीए, हॉटेल मॅनेजमेंट, फार्मसी, बी. आर्च, एम. आर्च, विधी तीन वर्षे, पाच वर्षे, बी. प्लानिंग, एम. प्लानिंग, नर्सिंग, बीसीए, बीबीए, बीएमएस आदी अभ्यासक्रमांना प्रवेश घेतात. त्यासाठी केंद्रीय प्रवेश परीक्षा अर्थात कॅपच्या तीन फेऱ्या तसेच संस्थास्तरावरील कोटा प्रवेश आणि कॅप अगेन्स व्हॅकन्सी अशा फेऱ्या राबविण्यात येतात. परंतु याची सर्वकष माहिती विद्यार्थी आणि पालकांना दिली जात नाही. त्यामुळे त्यांचे आर्थिक आणि मानसिक नुकसान होत असल्याचे दिसून येत आहे.



### प्रवेश प्रक्रियेचा डॅशबोर्ड उपलब्ध करून द्यावा

» "तंत्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या इन हाऊस आणि मॅनेजमेंट कोट्यातील प्रवेशाच्या माध्यमातून लाखो रुपयांचा आर्थिक व्यवहार केला जातो. त्यामुळे संबंधित प्रवेशांचा डॅशबोर्ड केला, तर पारदर्शकता येऊन त्याला आळा बसण्याची शक्यता आहे. त्यामुळेच केवळ आर्थिक हित डोळ्यांसमोर ठेवूनच सीईटीसेल प्रवेश प्रक्रियेची त्रोटक माहिती संकेतस्थळावर देत असल्याचा आरोप पालक तसेच विद्यार्थी संघटना करत आहेत. त्यामुळे पुढील वर्षापासून तरी सर्वच अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचा डॅशबोर्ड उपलब्ध करून द्यावा," अशी मागणी सम्यक फाऊंडेशन महाराष्ट्रचे संस्थापक आनंद रणधीर यांनी केली.

यासंदर्भात माहिती देतान पालक प्रतिनिधी राहूल गायकवाड म्हणाले, "राज्यात आरटीई प्रवेशापासून अकरावी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. ती राबवत असताना संबंधित प्रवेश प्रक्रियेची माहिती डॅशबोर्डच्या माध्यमातून दिली जाते. तशीच माहिती काही प्रमाणात उच्च शिक्षण विभागामार्फत दिली जाते. गेली काही वर्षे दिली जात असलेली विधी प्रवेशाची माहिती यंदा मिळत नसल्याचे दिसून येत आहे. तर गेली अनेक वर्षे तंत्रशिक्षण प्रवेशाच्या एकाही अभ्यासक्रमाची माहिती डॅशबोर्डच्या माध्यमातून विद्यार्थी आणि पालकांना दिली जात नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत शंका निर्माण होत आहे. महाविद्यालयांकडून प्रवेश प्रक्रियेमध्ये गोंधळ घातला जातो. खरी आकडेवारी पालक, विद्यार्थ्यांसमोर येणे आवश्यक आहे."

# राज्य सरकारच्या सेवेतील दोन उपायुक्त प्रतिनियुक्तीवर..

## पंकज पाटील आणि प्रदीप ठेंगल यांची उपायुक्त पदी नियुक्ती...



**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका सेवेत राज्य सरकारच्या सेवेतील दोन उपायुक्त प्रतिनियुक्तीवर रुजू झाले आहेत. त्यापैकी पिंपरी चिंचवड महापालिकेत सहाय्यक आयुक्त पदावर कार्यरत असलेले पंकज पाटील यांना उप आयुक्त पदावर नव्याने पदस्थापना देण्यात आली आहे. तर नवी मुंबईतील नगरपरिषद प्रशासन संचालनालयात सहाय्यक आयुक्त पदावर कार्यरत असलेले प्रदीप ठेंगल यांना नव्याने महापालिका सेवेत उपआयुक्त पदावर रुजू करुन घेण्यात आले आहे. राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने याबाबतचे आदेश दिले आहेत. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर राज्यातील गट अ व ब मधील प्रशासकीय अधिकाऱ्याच्य बदल्या करण्यात आल्या आहेत. याबाबत नगरविकास विभागाच्या वतीने बदलीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिका सेवेत कार्यरत असलेले पंकज पाटील यांना महापालिका सेवेत उपआयुक्त पदावर आणखी सेवा करण्याची संधी मिळाली आहे. तर प्रदीप ठेंगल यांना नव्याने उपआयुक्त पदावर रुजू करुन घेण्यात आले आहे.

# रावेत गृहप्रकल्पासाठी पुन्हा निविदा काढणार

## लाभार्थ्यांना घरासाठी आणखी किमान 2 ते 3 वर्षांची प्रतीक्षा करावी लागणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रावेत येथील पंतप्रधान आवास योजनेतील गृहप्रकल्पांची निविदा रद्द करण्यात आली आहे. आता नव्याने निविदाप्रक्रिया राबविली जाणार आहे. ऑक्टोबर 2020 पासून बंद असलेले हे काम, त्यात निविदाप्रक्रिया राबविण्यात लागणारा कालावधी यामुळे लाभार्थ्यांना घरासाठी आणखी किमान 2 ते 3 वर्षांची प्रतीक्षा करावी लागणार आहे.



रावेत येथील 2 हेक्टर जागेत हा प्रकल्प राबविला जात आहे. त्यासाठी 2019 ला निविदाप्रक्रिया राबविण्यात आली होती. त्या गृहप्रकल्प बांधकामाची वर्कऑर्डर 30 मे 2019 ला देण्यात आली. एकूण 79 कोटी 45 लाख 92 हजार 790 रुपये खर्चाचे काम मन इन्फ्रा. कन्स्ट्रक्शनला देण्यात आले आहे. इमारतीचे काम सुरू करण्यात आले. फाउंडेशनचे काम झाले होते. प्रकल्पाविरोधात रावेत येथील एका व्यक्तीने मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता. मात्र, उच्च न्यायालयाने कामास स्थगिती दिल्याने तेथील काम ऑक्टोबर 2020 पासून ठप्प आहे.

संबंधित व्यक्तीचा दावा उच्च न्यायालयाने फेटाळत महापालिकेस काम करण्याचे आदेश दिले. त्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने महापालिकेच्या बाजूने निकाल देत काम सुरू करण्यास परवानगी दिली आहे. न्यायालयीन अडचण दूर झाल्याने काम लवकरच सुरू होईल, अशी लाभार्थ्यांना आस होती. मात्र, हे काम सुमारे 4 वर्षे बंद असल्याने तसेच, बांधकाम साहित्यांचे दर महाग झाल्याने खर्च वाढला आहे. त्यामुळे या प्रकल्पाची नव्याने निविदा काढण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

### पावणेचार वर्षांपासून लाभार्थ्यांना घराची आस

रावेत गृहप्रकल्पात 323 चौरस फूट चटई क्षेत्र आकाराच्या एकूण 934 सदनिका आहेत. सदनिकांची सोडत 27 फेब्रुवारी 2021 ला काढण्यात आली. त्यासाठी लाभार्थ्यांकडून 5 हजार रुपये महापालिकेने जमा करून घेतले. पावणेचार वर्षे झाले तरी, सदनिका न मिळाल्याने लाभार्थी नाराजी व्यक्त करीत आहेत. नव्याने निविदाप्रक्रिया राबविण्यास किमान 3 ते 4 महिन्यांचा कालावधी जाणार आहे. विधानसभा आचारसंहितेनंतर निविदा प्रकिया सुरू होईल. त्यानंतर प्रत्यक्ष काम पूर्ण होण्यास अडीच ते तीन वर्षांचा कालावधी लागू शकतो. म्हणजे आणखी किमान तीन वर्षे घरासाठी सर्वसामान्यांना प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# विनापरवाना फटाका स्टॉलमुळे नागरिकांचा जीव धोक्यात

## योग्य ती खबरदारी घेतली जात नसल्याचं चित्र : आजूबाजूच्या परिसराक धोका निर्माण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात लोकवस्ती भागात विनापरवाना फटका स्टॉल उभारण्यात आले आहेत. तसेच, काही भागात गोदामे आहेत. आगीसारख्या दुर्घटना घडू नये, म्हणून योग्य ती खबरदारी घेतली जात नसल्याचे धक्कादायक चित्र आहे. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरात धोका निर्माण झाला आहे. दसरा आणि दिवाळी सणाच्या कालावधीमध्ये तसेच, लग्न, कार्यक्रम व धार्मिक उत्सवाच्या वेळी आतषबाजी केली जाते. शहरातील फटका दुकानदार व विक्रेते फटाक्यांची विक्री करतात. दुकाने व स्टॉल हे उघड्या जागेत मैदानात उभारण्याचा नियम आहे.




एखादी दुर्घटना घडल्यास कमीत कमी नुकसान व्हावे, या त्यामागील हेतून आहे. मात्र, हे फटाके स्टॉल व दुकाने भर लोकवस्तीमध्ये आहेत. तर, काही इमारती तसेच, बाजारपेठेत आहेत. त्यामुळे आगीसारख्या दुर्घटनेतून मोठी वित्त व जीवितहानी होण्याचा धोका नाकारता येत नाही. फटाक्यांची विक्री करताना विस्फोटक अधिनियम व नियमांतर्गत असलेल्या सुरक्षा नियमांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

वास्तविक फटाका विक्रीची दुकाने खुल्या जागेमध्ये किंवा पटांगणामध्ये विक्रीसाठी असणे आवश्यक आहे. त्यामुळे एखादी घटना घडल्यास कमीत कमी नुकसान होईल. तसेच फटाक्यांचा साठा आणि विक्री यांचे नियमन व सनियंत्रण करणे शक्य होईल. मात्र, शहरातील विनापरवाना आणि अवैधपणे फटाका विक्री व साठवणूक करणार्‍याविरुद्ध कारवाई केली जात नसल्याचे चित्र आहे.

### फटाका विक्रेत्यांसाठी असे आहेत नियम :

प्रत्येक फटाके विक्री दुकानातील अंतर हे कमीत कमी 3 मीटरचे असावे. दुकाने मोकळ्या जागी व्यवस्थित कोणत्याही प्रतिबंधित इमारतीपासून 50 मीटरपेक्षा कमी अंतरावर नसावीत. प्रत्येक फटाके विक्री दुकानातील स्टॉक मर्यादा जास्तीत जास्त 100 किलो राहील. ज्या जागेत फटाका स्टॉक उभारायचा आहे.

त्या ठिकाणचा नकाशा त्यावर संबंधित पोलीस निरीक्षकांनी जागा सुरक्षिततेबाबत स्वाक्षरी करून ना हरकत दाखला सादर करावा. संबंधित पिंपरी-चिंचवड महापालिकेने फटाका स्टॉल बाबत शिफारस करावी. नियोजित जागेबाबत आवश्यक ती कागदपत्रे सादर करावी. पोलिस आयुक्तांनी कायदा व सुव्यवस्था, अर्जदाराची वर्तणूक आणि दुकानाच्या बाबतीत अर्जदाराने सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन केले किंवा कसे, याबाबत सर्वंकष अहवाल द्यावा.

महाराष्ट्र नगर पंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 281 नुसार संबधित महापालिकेचा परवाना आवश्यक आहे. संबंधित तहसीलदार यांचे फटाक्याचे दुकानासाठी अर्जदाराने अर्जासोबत सादर केलेले रहिवाशीबाबत पुराव्याची खातरजमा करून अर्जदार नमूद पत्त्यावर राहतात किंवा कसे? याबाबत आणि अर्जदार यांचेकडून कसल्याही प्रकारची शासकीय थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र तसेच दुकानाच्या जागेच्या नकाशाची प्रमाणित प्रत असावी.

व्यवसाय कर अधिकारी, व्यवसाय कर कार्यालय, पिंपरी-चिंचवड महापालिका यांचे ना हरकत प्रमाणपत्र हवे. परवानाधारकास नमूद केलेल्या अटींचे पालन करणे बंधनकारक राहील. विक्रेत्याने फटाक्यांची विक्री करताना त्याची आवाजाची तीव्रता 125 डेसिबलपेक्षा जास्त नसावी.

### परवाने तपासून फटाके स्टॉलला परवानगी

» पोलिस, महावितरण, महापालिका आदींचे आवश्यक परवाने तपासून घेतल्यानंतर शहरात फटाके स्टॉलला परवानगी दिली जात आहे. त्यात अग्निप्रतिबंधक उपाययोजना करणे बंधनकारक आहे. जागेची पाहणी केल्यानंतर तात्पुरती परवानगी दिली जाते, असे महापालिकेच्या अग्निशमन विभागाचे उपायुक्त मनोज लोणकर यांनी सांगितले.

### लोकवस्तीतील फटाका स्टॉलला परवानगी देऊ नये

» सार्वजनिक ठिकाणी, निवासी इमारतीमध्ये, गर्दीच्या ठिकाणी फटाका विक्री व साठवणूक करण्यास महापालिका व पोलिसांनी परवानगी देऊ नये. नियमांकडे दुर्लक्ष करणार्‍या विक्रेत्यांचे दुकान परवानारद्द करावा. विस्फोटक अधिनियम 2008 व नगरविकास विभाग शासन निर्णय 5 नोव्हेंबर 2016 ची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जावी. लोकवस्तीतील विनापरवाना फटाका स्टॉलमुळे दुर्घटना घडू नये यासाठी वेळेची खबरदारी घ्यावी, असे कॉप्स संस्थेचे अध्यक्ष आदम बेग यांनी सांगितले.

# खेडमध्ये सर्वपक्षीय विरोधक एकवटले

## पुण्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले : दिलीप मोहिते-पाटलांविरोधात देणार नवा पर्याय

**पुणे | प्रतिनिधी**

उत्तर पुण्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. खेडचे विद्यमान आमदार दिलीप मोहिते-पाटील यांना थांबविण्यासाठी सर्वपक्षीय विरोधक एकवटल्याचे समोर आले आहे. शुक्रवारी चाकण येथे झालेल्या बैठकीत विरोधकांनी खेड-आळंदी विधानसभा मतदार संघासाठी नवा पर्याय देणार असल्याचा निश्चय केला आहे.



### वळसे-पाटील, बेनकेंची धाकधूक वाढली

» एकीकडे देवदत्त निकम, तर दुसरीकडे रमेश येवले दोघेही महाविकास आघाडीचे आहेत, त्यामुळे सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील यांची धाकधूक वाढू लागली आहे. निकम यांना वळसे-पाटील यांच्या गावातूनच सहानुभूती मिळत आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये शरद पवारांना मिळालेली सहानुभूती सर्वांनी अनुभवली आहे. विधानसभा निवडणुकीतही तशीच अवस्था असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. काही दिवसांपूर्वी दिलीप वळसे-पाटील यांनीही शरद पवार यांची भेट घेतली होती. पण, त्याचा काही उपयोग झाला नाही. तिकडे अतुल बेनके यांनीही शरद पवार गटात जाण्यासाठी कंबर कसली होती. भाऊ अमोल बेनके त्यांनतर कुटुंबातील अन्य सदस्यांनीही शरद पवारांना भेटून अतुल बेनके यांना पक्षात घेण्याची विनंती केली होती. मात्र, तसे काही झाले नाही. शरद पवारांच्या लाटेमुळे वळसे-पाटील, अतुल बेनके अस्वस्थ असल्याची चर्चा उत्तर पुण्यात सुरू झाली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उत्तर पुण्यामध्ये मोठी खलबते सुरू झाली आहेत. खेड, आंबेगाव आणि जुन्नरला अजित पवार गटाचे आमदार आहे. त्यामुळे शरद पवारांनी या मतदारसंघावर विशेष लक्ष दिले असल्याचे वेळोवेळी स्पष्ट झाले आहे. खेड तालुक्यामध्ये आमदार दिलीप मोहिते-पाटील यांची अपवाद वगळता एक हाती सत्ता आहे. तालुक्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढली असून, वादविवादाचे प्रकारही वाढू लागले आहे. या प्रकारामुळे तालुक्याचा विकास खुंटला आहे. या पार्श्वभूमीवर महायुती, महाविकास आघाडीतीलच नाही तर अन्य पक्षातील नेतेमंडळी एकवटली आहे. शुक्रवारी चाकण येथे या सर्वपक्षीय नेतेमंडळींची बैठक झाली. त्यामुळे खेड-आळंदी मतदारसंघात नवा पर्याय मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

बैठकीसाठी शिंदेसेनेचे जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे जिल्हाप्रमुख अशोक खांडेभराड, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील, जिल्हाध्यक्ष समीरभाऊ थिगळे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे माजी जिल्हा परिषद सदस्य अनिलबाबा राक्षे, युवा नेते सुधीर मुंगसे, माजी सभापती रामदास ठाकूर, शिवसेनेचे माजी जिल्हा परिषद सदस्य बाबाजी काळे, निवडणूक समन्वयक माजी उपसभापती अमोलदादा पवार, शिंदेसेनेचे संघटक अक्षय जाधव, तालुकाप्रमुख राजूशेठ जवळेकर, प्रदूषण महामंडळाचे संचालक नितीन गोरे, सुनील धंद्रे, युवा नेते संजय घनवट, बाजार समितीचे संचालक अनुराग जैद, सागर मुऱ्हे, विशाल पोतले यांसह विविध पक्षांचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी खेड तालुक्यात शांतता प्रस्थापित व्हावी, चांगले वातावरण राहावे, तालुक्याचा सर्वांगीण विकास व्हावा, भीतीचे वातावरण नष्ट व्हावे, यासाठी समाज मान्यता असलेला आणि चांगली वर्तणूक असलेला उमेदवार तालुक्याचा आमदार व्हावा, अशी चर्चा या बैठकीत झाल्याचे बैठकीतील एका पदाधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले आहे.

ही अतिशय महत्त्वाची घटना असून, आतापर्यंत खेड तालुक्यामध्ये अशा प्रकारे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन अनेक निर्णय केले आहेत. नुकतीच कृषी उत्पन्न बाजार समितीची सत्ता देखील त्याच माध्यमातून परिवर्तन झाली आहे. या प्रमुख नेत्यांना एकत्रित आणत असताना या पाठीमागे तालुक्यातल्या अनेक ज्येष्ठ मंडळींचा देखील हातभार असेल, असे बोलले जात आहे.

# जुन्नर तालुक्यात बिबट्यांची दहशत

## वनविभागाने बिबट्यांच्या वाढत्या संख्येला रोखण्यासाठी लवकरात लवकर नियोजन करावे : ग्रामस्थांची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

शुक्रवारी सकाळी दहा वाजेच्या सुमारास एकाचवेळी तीन बिबट्यांचा मुक्तसंचार पाहून नागरिकांना मोठा धक्का बसला आहे. शेतात चाललेल्या शेतकऱ्याने ते सगळं मोबाईलमध्ये कैद केलं. संबधित शेतकरी ट्रॅक्टरमध्ये असल्याने तो बचावला. ही घटना जुन्नर तालुक्यातील आळेफाटा परिसरातील मोरया हॉस्पिटल जवळील आहे.



### महिला शेतकऱ्यांना गमवावा लागतोय जीव

» जुन्नर परिसरात बिबट्यांची दहशत दिवसेंदिवस वाढत चालली आहे. महिला राखणदार शेतात गेल्यावर बिबट हल्ला होण्याच्या घटनाही घडल्या आहेत. मागील काही महिन्यांपूर्वी दोन महिलांनी बिबट्याच्या हल्ल्यात जीव गमावला होता. शेतकरी आणि जुन्नर तालुकयातील नागरिक सध्यस्थितीत भयभीत झाले आहेत. दिवसाढवळ्या अथवा रात्रीही बिबट्याचे हल्ले होताना दिसत आहेत. महिला, लहान मुलांबरोबरच इतरांचाही जीव धोक्यात असल्याचे समोर आले आहे. वनविभागाने बिबट्यांच्या वाढत्या संख्येला रोखण्यासाठी लवकरात लवकर नियोजन करावे अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

जुन्नर तालुक्यात बिबट्याची दहशत वाढली असल्याच्या रोज नव्याने पाहायला मिळत आहे. बिबट्यांचे मानवी हल्ले किंवा पाळीव प्राणी हल्ल्यांचे प्रमाणही वाढत आहे. आळेफाटा परिसरात मोठ्या रहिवाशी इमारती झाल्या आहेत. बिबट्यांची संख्या वाढत असल्यामुळे नव्याने जन्म झालेले बछडे अन्न व पाण्याच्या शोधात थेट आळेफाटा परिसरात येत आहेत. मात्र आळेफाटा परिसरात दाखल झालेले बिबट्या पकडण्यासाठी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. ३ बिबटे उभे असलेला हा व्हिडीओ सगळीकडे व्हायरल झाल्यानंतर नागरिक घाबरले असून वन विभागाला त्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.